# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

## परिपत्रक

संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भ क्र.सोविसो/मविविमं/संलग्नता/७२८२, दि.३०/०७/२०१६ रोजीच्या परिपत्रकाद्वारे रु. ५०/- प्रमाणे विद्यापीठ विकास निधीची रक्कम विद्यापीठाकडे जमा करण्याबाबत कळविले होते. त्यासअनुसरुन काही महाविद्यालयानी रु. ५०/- प्रमाणे विद्यापीठ विकास निधी विद्यापीठाकडे जमा केलेले आहे. तथापि, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ विकास निधीच्या रक्कमेत दंडक क्र. ३७ नुसार वाढ झाल्याने ज्या महाविद्यालयांनी यापूर्वी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. ५०/- प्रमाणे विद्यापीठ विकास निधी विद्यापीठाकडे जमा केलेली आहे अशा महाविद्यालयांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वाढीव रु.२५/- प्रति विद्यार्थी प्रमाणे वाढीव विद्यापीठ विकास निधी तात्काळ जमा करावा.

तसेच ज्या महाविद्यालयानी अद्याप विद्यापीठ विकास निधी विद्यापीठाकडे जमा केलेली नाही अशा महाविद्यालयानी सदर परिपत्रकास अनुसरुन पदवीकरीता रु.५०/- तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता रु.७५/- प्रमाणे विद्यापीठ विकास निधी विद्यापीठाकडे जमा करावा.

विद्यापीठ विकास निधी सादर करताना खालील उदाहरणादाखल दिलेल्या तक्त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये आपल्या महाविद्यालयात चालू असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांची (पदवी/पदव्युत्तर) प्रवेश प्रक्रिया पूर्ण होताच वर्गवार प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी तयार करुन एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणात विद्यापीठ विकास निधी कोणत्याही परिस्थितीत ३० सप्टेंबर, २०१६ अखेर या कार्यालयाकडे जमा करावा. अन्यथा जी महाविद्यालये विहीत मुदतीत विद्यापीठ विकास निधी जमा करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र | अभ्यासक्रम | वर्ष | प्रवेशित विद्यार्थी | एकूण प्रवेशित विद्यार्थी | विद्यापीठ विकास निधीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी.ए. | प्रथम | | | पदवी अभ्यासक्रम एकूण प्रवेशित विद्यार्थी X ५० |
| | | द्वितीय | | | |
| | | तृतीय | | | |
| २ | एम.ए. | प्रथम | | | पदव्युत्तर अभ्यासक्रम एकूण प्रवेशित विद्यार्थी X ७५ |
| | | द्वितीय | | | |
| | | | | एकूण रु. | |

जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/२०१६-१७/ ८०९६
दिनांक : 23 AUG 2016

[प्राचार्य, आर. वाय. पाटील]
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रति,

**१. मा.प्राचार्य/संस्थाचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.**

**२. परीक्षा विभाग, सोविसो.**